**कायम विनाअनुदान तत्वावर**
(माध्यम इंग्रजी)

जाक्र प्राथ-२/खाप्राशा/मा.इंग्रजी/२०१५/ 3332/38
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 21 AUG 2015

प्रति,

प्रशासन अधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड

विषयः सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी)

संदर्भः
१. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र नप्राशा-१७०६/(११४/२००६) प्राशि-३ दिनांक १६.०५.२००६.
२. प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड यांचे पत्र क्र.शिक्षण/खाप्राशा /३/कावि/४६८/०६ दि. ३०.०६.२००६
३. शासन पत्र क्र न्यायाप्र-२००८/(१९२/०८)माशि-१ दि. १७.०३.२००८
४. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र- नमाशा-२००७/(९८६/०७) दि. १९.१०.२००७.
५.या कार्यालयाची शाळा सुरु करण्याची परवानगी आदेश पत्र जा.क्र.शिउसं/ प्राशि-३/नखाप्राशा/पुवि-०८ दि.१६.०६.२००८
६. या कार्यालयाचे प्रथम मान्यता आदेश दिनांक ०६.०२.२०१०
७. प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड यांचे पत्र दि. ११.०८.१४.
८.प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड यांचे पत्र दि पत्र दि. ०४.०६.०१
९. पर्यवेक्षक मनपा पिंपरी चिंचवड यांचा दि. १७.०४.२००९ चा भेट व तपासणी अहवाल
१०. या कार्यालयाचे पत्र दिनांक २८.०१.२०१५
११. मा. शिक्षण संचालक (प्राथ) म.रा. पुणे-१ यांचे पत्र क्र खाप्राशा/इंग्रजी मान्यता/ १६१३/२०१५/प्रशा-५१३/३१९५ दि. ०९.०७.२०१५

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे. तसेच संदर्भ क्र-११ च्या पत्रानुसार कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००६ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००६ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | डेक्कन इन्स्टिटुट ऑफ कॉमर्स ५१४, बुधवार पेठ पुणे | किडस वर्ल्ड प्रि प्रायमरी स्कुल, पुणे-४४ | १ ली | इंग्रजी | जून २००६ पासून |

<u>कायम विना अनुदानित</u>

प्रशासन अधिकारी नगरपालिका शिक्षण मंडळ व शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद पुणे यांना सदर संस्थेकडुन खालील टींची पुर्तता होते किंवा कसे याबाबत समक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात येत आहे.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबधित संस्थाना शाळा परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१. सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.
२. संस्थेविरुध्द् गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

... शाळा चालु ठवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पुर्तता तीन महिन्यात पुर्ण करेल.

९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे .

१०. सक्षम अधिका-यांनी संबधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.

११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबधित संस्था उघडणार नाही . असे संबधित संस्थेकडुन परवानगी देण्यापुर्वी रु. २०/- च्या स्टम्पॅपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबधित शाळा काढणार नाही. याबाबत देखील संबधित संस्थेकडुन परवानगी देण्यापुर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१३. शासन निर्णय क्र माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१ दि. १९.१०.२००७ नुसार पुढील शैक्षणिक वर्षात (२००८-०९) शाळा सुरु न केल्यास यानंतर नुतनीकरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही सदर शाळांचे परवानगी आदेश रद्दबातल होतील याची नोंद घ्यावी.

१४. संस्थेकडुन रु.२०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम स्वरुपी विना अनुदान तत्त्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्य अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडुन लिहुन घेणे आवश्यक आहे व यांच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५. संस्थेने शाळेस नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी (उदा. नांव, जात, जन्मदाखला, नेमणूक दिनांक , शैक्षणिक पात्रता इत्यादी) .

सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालु नाही. सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १५ अटींची पुर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसाच्या आत आपल्या जिल्हयाचे मनपा/नपा चे शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प. /प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ यांचे कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रासह / प्रमाणपत्रासह कळवावे. शाळा परवानगी दिलेल्या वर्षी शाळा सुरु केली नसल्यास सदर पत्र प्राप्त झाले पासुन सता दिवसांचे आत शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प./ प्रशासन अधिकारी मनपा व या कार्यालयास लेखी कळवावे.

**संदर्भ क्र-११ अन्वये यापुर्वीचे दिनांक १६.०६.२००८ चे आदेश अधिक्रमीत करण्यात येत आहेत.**

**(रामचंद्र जाधव)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. शिक्षणधिकारी (प्राथ) जि.प. पुणे

२. प्रशासन अधिकारी मनपा पिंपरी चिंचवड

२/- आपण सदर संस्थेच्या मुळ प्रस्तावावरुन सविस्तर पत्त्यावर वरील शाळा परवानगी देण्याचे विचारणधीन असल्याचे आपले स्तरावरुनही तात्काळ कळविण्यात यावे. मुळ प्रस्तावित परवानगीचे ठिकाण व माध्यम याबाबत खात्री करावी व वरील अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा. शाळा प्रत्यक्ष सुरु नसल्यास तसे लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.